# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०६/२०१८

**१) संगनमत करून शासकिय कामात अडथळा करून विनयभंग करण्याची चितावनी देवुन शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक २६/०६/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सरपंच साकरा हे ग्रामपंचायत मध्ये वृक्ष रोपनासाठी मामा तलावाची माती ट्रॅक्टर द्वारे मजुराचे मार्फतीने आणत होती, तेव्हा यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे ट्रॅक्टर सार्वजनीक रस्त्यावर अडवीले व शासकिय कामात अडथडा निर्माण केला, तेव्हा फिर्यादीस ट्रॅक्टर चालकाने फोन द्वारे बोलावीले व आरोपी क्र. २ यांनी विनयभंग करण्याचा उद्देशाने चितावनी देवुन शिवीगाळ करून धमकी दिल्याने फिर्यादी हिचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३४१,३५३,३५४(ब), ५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**२) दारू पिवुन थापड बुक्यानी व दगडाने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक २६/०६/२०१८ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी पती याने दारू पिण्याकरीता फिर्यादीस पैसे मागीतले असता, पैसे नाही असे म्हटल्यावर आरोपीने थापड बुक्यानी, जोडे व दगडाने मारून फिर्यादीस जखमी केल्याने डॉ. मेमो, एमएलसी रिपोर्ट व फिर्यादी सौ. सुषमा रोशन वडतकर वय ३० वर्ष रा. नविन टाकळी भंडारा यांचे बयाणा वरून रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) विटाच्या तुकडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक २५/०६/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही दुकाणातुन काम करून घरी परत जात असतांना यातील आरोपीने 'तु माझ्या गोष्टी करतेस पोलीसांना रिपोर्ट का केली' असे म्हणुन विटाचा तुकडा डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी सौ. लता राजेश भिवगडे वय ३५ वर्ष रा. विवेकांनद नगर तुमसर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,४०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) निष्काळजीपणे वॅगनार वाहन चालवुन सायकल स्वार मुलाला धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक २६/०६/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगईने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा जखमी मुलगा करन नजरज वंजारी वय १५ वर्ष याचे सायकलला धडक मारून त्यास जखमी करण्यास कारणीभुत होवुन पळुन गेल्याने फिर्यादी नजरत किसन वंजारी वय ३२ वर्ष रा. सालेबर्डी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१३४(अ)(ब),१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

५) दारूच्या नशेत वाहन चालवुन विद्युत खांबाला धडक मारल्याने गुन्हा नोंदः—

दिनांक २५/०४/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत सावरी गावातील रोडने भरधाव वेगाने चालवुन लोंकाचे जिवीतास धोका होईल असे चालवुन विद्युत खांबाला धडक मारल्याने फिर्यादी निखल बाळकृष्ण चाचरकर वय २७ वर्ष रा. सावरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९ भादवी. सहकलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) लापरवाहीने वाहन चालवुन दगडाला धडक मारून उपचारादरम्यान मरण पावल्याने गुन्हा नोंद: —

दिनांक १०/०६/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी मृतक देवाजी गनबा बोपटे वय ६० वर्ष रा आलेसुर याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल लापरवाहीने व भरधाव वेगात चालवुन रोडच्या किणारी असलेल्या उभ्या दगडाला धडक मारून गंभिर जखमी होवुन त्यास दि. १०/६/२०१८ ला लक्ष हॉस्पीटल भंडारा येथे भरती केले असता उपचारादरम्यान दि. २२/०६/२०१८ चे ०६.३० वाजता उपचारादरम्यान मरण पावल्याने पोलीस स्टेशन भंडारा मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरून व अपघात रजिस्टर क्र. ०६/१८ दि. १२/०६/२०१८ चे चौकशी अहवाल व सरतर्फे पोहवा. मुंडले यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत. .

७) वॅगनार गाडीच्या धडकेत मोटार सायकल स्वार दोन महिला जखमी झाल्याने गुन्हा नोंद: —

दिनांक २६/०६/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याची मोटार सायकल स्प्लेंडर क्र. एमएच ३६ व्ही ८६७२ ने सोबत सौ. अश्विनी लांजेवार सह डबलसिट पोहरा वरून भंडारा येथे जात असतांनी बसस्टॉप चौक लाखनी एनएच ०६ रोडवर समाधान हॉटेल कडुन यातील आरोपी चालकाने रस्ता क्रॉस करीत असतांना फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारल्याने फिर्यादी व मागे बसणारी महिला हे दोघेही जखमी झाल्याने आरोपी त्याचे गाडीसह पोलीसांना घटणेची माहीती न देता पळुन गेल्याने फिर्यादी हर्षल दामोधर गायधने वय २५ वर्ष रा. मंगलपांडे वार्ड भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१३४ (ब)/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत

८) तिस—या मजल्यावरून खाली पडुन गंभिर जखमी होवुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु गुन्हा नोंद: —

दिनांक २२/०६/२०१८ चे ११.३० ते २३/०६/२०१८ चे ०१.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने लिटील फ्लॉवर कॉन्वेट इमारतीचे तिन मजल्याचे बांधकाम करण्याचा ठेका घेवुन स्लॅब तयार करण्यासाठी लोहा बाधण्याकरीता मृतक धम्मरत्न मन्साराम लोनारे वय ३३ वर्ष रा. दैतमांगली व त्याचा सहकारी मजुरांना कामावर बोलावुन रात्री उसीरा पर्यत काम करून घेत असतांनी त्या ठिकाणी निष्काळजीपणे मजुराचे सुरक्षीतेच्या दृष्टीने कोणतीही काळजी न घेता मजुरा कडुन काम करून घेत असतांना यातील मृतक हा इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून खाली पडुन गंभिर जखमी होवुन उपचारा दरम्यान मरण पावल्याने मर्ग क्र. ३५/१८ कलम १७४ जाफौ. चे मर्गचे चौकशी अहवाला वरून तसेच सरतर्फे फिर्यादी पोउपनी. ताराम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. सोरसे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत

**९) नौकरी करीता दिलेले पैसे परत न करता फसवणुक केल्याने गुन्हा नोंद: –**

दिनांक ०६/१०/२०१५ ते २६/०६/२०१८ पर्यत यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी व इतर २६ जनांना आसाम रायफल येथे नर्सिंग असिस्टंटची नौकरी लावुन देतो असे सांगुन प्रती उमेदवार ५ लाख रूपये व सर्वीस सिट करीता २०,०००/रु. असे एकुण १ कोटी ४० लाख ४० हजार रूपये घेवुन आसाम रायफलचे बनावट सही व शिक्यांचे खोटे नियुक्ती पत्र तयार करून फिर्यादी व इतर २६ व्यक्तींना देवुन त्यांना असाम येथे नर्सीगचे प्रशीक्षण देवुन त्यांना नौकरी लावुन न देता वांरवार तारखा देवुन त्यांनी नौकरी करीता दिलेले पैसे परत न करता फसवणुक केल्याची फिर्यादी चुन्नीलाल सुनिल धार्मीक वय ३० वर्ष रा. गिरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४२०, ४६५,४६८ ४७१,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. कदम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**१०) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून पुढे पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद: –**

दिनांक २५/०६/२०१८ चे १८.०० वाजता यातील फिर्यादी ही वन विभागात वनरक्षक या पदावर नौकरीवर असुन ती तीचे सोनेगाव बिट मध्ये गस्त करीत असतांना फिर्यादीने यातील आरोपीचे ट्रॅक्टर थांबवुन ट्रॅक्टरची तपासनी करीत असता आरोपी क्र. याने अश्लिल शब्दात शिवीगाळ करून 'माझा ट्रॅक्टर कशाला थांबवीला असे बोलुन त्याचे ड्रायव्हरला चालव हिच्या अंगावर जे काही होईल ते पाहुन घेवु'असे बोलला व आरोपी क्र. ०२ याने 'बाजुला हो' असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व दोन्ही आरोपीतांनी पुढे पाहुन घेण्याची धमकी दिली व यातील फिर्यादीचे सार्वजनीक कामात अडकाव निर्माण केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,१८६,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**११) एचपी गॅस सिलेंडरची चोरी : –**

दिनांक २१/०६/२०१८ चे १०.३० ते २६/०६/२०१८ चे ०८.३० वाजता यातील फिर्यादी हे परीवारासह नागपुर येथे बहिनीकडे कार्यक्रमाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून घरातील सामान अस्थाव्यस्त फेकुन किचन रूममधील १ एचपी कंपनीचा भरलेला गॅस सिलेंडर किमती १६,००/रु. चोरून नेल्याने फिर्यादी मिलींद महादेव बोरकर वय ५६ वर्ष रा. परसोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**१२) शेतात लावलेली मोटार पंपची चोरी: –**

दिनांक २३/०६/२०१८ चे १९.०० ते २४/०६/२०१८ चे १२.०० वाजता यातील फिर्यादीने त्याचे शेतातील पाणी देण्याकरीता शेता जवळील खुल्या जागेतील नाल्याचे बंधा–यामधील पाण्यात लावलेली लक्ष्मी कंपनीची ३ एचपी पाणबुडी विद्युत मोटार पंप अंदाजे कि. ७,०००/रु. ची यातील संशयीत आरोपीने चोरून नेले असावे असे फिर्यादी गुलाब चांगोजी मोरे वय ३९ वर्ष रा. सिलली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावळे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**१३) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद: –**

दिनांक २५/०६/२०१८ चे १६.३० वाजता यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष ही लहान पानापासुन आजोबा कडे राहत होती घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीची मुलीला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.